सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एच.एम.सी.टी. / एम.बी.ए./ एम.एम.एस. व एम.सी.ए.या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या नवीन संस्थांना व सध्या सुरु असलेल्या या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमधील प्रवेश क्षमतेत वाढ / घट करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

-------------------------------

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : टीईएम-२००४/(२३५/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जून, २००४

संदर्भ :

१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/ एमएस/इंजि./२००४/००९ व इतर ,दि.११.५.२००४ ची पत्रे.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/ एमएस/फार्म./२००४/०६२ व इतर दि.११.५.२००४ ची पत्रे.
३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/ एमएस/एचएमसीटी./२००४/००६,दि.११.५.२००४ ची पत्रे.
४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.पीजी /एमबीए /महा/२००४/००६ व इतर,दि.११.५.२००४ ची पत्रे.
५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.पीजी /एमसीए/महा/२००४/०१० व इतर,दि.११.५.२००४ ची पत्रे.
६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.७४०-८९-२१४(इ)/आरसी/ ९४ व इतर ,दि.१४.५.२००४ ची पत्रे.
७) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.७४०-८९-१३९(पी)/इटी / ९६ व इतर .दि.१४.५.२००४ ची पत्रे.
८) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.४३१/२७-२०,८०/एमसीपी(एम)/ ९४ व इतर ,दि.१४.५.२००४ ची पत्रे.
९) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.एमएस-१७/बीओएस/(एमसीए)/पीआर(सीएस)/९६ व इतर, दि.१४.५.२००४ ची पत्रे.
१०) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.,७४०-८९/००१(एनडीइजीएच)/ईटी/२०००, दि.१४.५.२००४ ची पत्रे.

शासन निर्णय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या दिनांक ११.५.२००४ व दि.१४.५.२००४ च्या संदर्भाधीन निरनिराळ्या पत्रान्वये सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एच.एम.सी.टी. / एम.बी.ए./ एम.एम.एस. व एम.सी.ए.या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या नवीन संस्थांना (प्रपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ) व सध्या सुरु असलेल्या या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमधील प्रवेश क्षमतेत वाढ / घट करण्यासाठी (प्रपत्र ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे) मान्यता दिली आहे.

H.R.Patel Women's College of Pharmacy
Office Seal
SHIRPUR

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेऊन शासनाकडून या शासन निर्णयान्वये संबंधीत नवीन संस्थांना व सध्या सुरु असलेल्या महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील फेरबदलास या सोबतच्या प्रपत्र अ व प्रपत्र ब नुसार सन २००४-०५ करीता मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता खालील अटी व शर्तींवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच दि.२१ मे,१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधीत संस्थांना बंधनकारक राहील.

२) शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल तसेच संबंधीत कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारक रित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांच्या संलग्नीकरणासाठी संबंधीत संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधीत विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश दिनांक १६.२.२००४ च्या शासन निर्णयान्वये व शासनाने मान्य केलेल्या संबंधीत अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) सध्या सुरु असलेल्या (जुन्या) संस्थांच्या बाबतीत परिषदेच्या मान्यतेच्या आदेशासोबत जोडलेल्या सहपत्रातील दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता सदर संस्थांनी याच वर्षी (२००४-०५) करणे आवश्यक असून, त्याचा पुर्तता अहवाल परिषदेच्या विभागीय कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही करावी.

७) ज्या संस्थांना परिषदेने या वर्षी No Admission Category मध्ये दर्शविलेले आहे. अशा सर्व संस्थांनी परिषदेने दिलेल्या निर्देशाप्रमाणे दिनांक ३० मे,२००४ पर्यन्त त्रुटींचा पुर्तता अहवाल परिषदेच्या मुख्य कार्यालयास सादर करावा. तसेच याबाबत दि.३० जून, अखेरपर्यन्त परिषदेकडून सुधारीत आदेश (जैसे थे) प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी. त्या शिवाय सक्षम प्राधिकरणाने यावर्षी सदर संस्थांची प्रवेश प्रक्रिया करु नये.

८) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांनी / संस्थांनी त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहीत मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या.र.चौरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे/नागपूर / औरंगाबाद / अमरावती / नाशिक
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
संबंधीत संस्थांना (संचालक, तंत्र शिक्षण यांचे मार्फत )
कार्यासन तांशि-६
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) सल्लागार, (युजी) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
२) विभागीय अधिकारी , पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल [illegible] बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई २०

H.R. Patel Women's College of Pharmacy
Office Seal
SHIRPUR

1.

शासन निर्णय क्र.टीईएम-२००४/(२३५/०४)/तांशि-१, दि.१ जून,२००४ चे

# प्रपत्र अ

अ) नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | मान्य प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, इंद्रायणी नगर, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे | १) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि. कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | २) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| २. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे सिंहगड इन्स्टि.ऑफ टेक्नॉलॉजी, कुशगांव (बु.)लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे | १) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि. कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | २) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| ३. | श्री.नेमिनाथ जैन, ब्रम्हाचार्य आश्रमचे कॉलेज ऑफ इंजि.नेमि नगर, चांदवड, जि.नाशिक | १) सिव्हील इंजिनिअरींग | ६० |
| | | २) कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजि. | ६० |
| | | ३) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| ४. | द नागपूर पॅलोटिन सोसायटीचे सेंट विन्सेंट पॅलोटी कॉलेज ऑफ इंजि.ॲण्ड टेक्नॉलॉजी, गौशी मानपूर, नागपूर | १) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | २) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० |

ब) नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीचे ओरिएंटल कॉलेज ऑफ फार्मसी, सानपाडा रेल्वे स्टेशनच्या बाजुला, सानपाडा, नवी मुंबई | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| २. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे सिंहगड इन्स्टि.ऑफ फार्मसीटीकल सायन्सेस, कुशगांव (बु.)लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |

H.R.Patel Women's College of Pharmacy
Office Seal
SHIRPUR

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मुळा एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ४. | संजीवनी रुरल एज्युकेशन सोसायटीचे संजीवनी कॉलेज ऑफ फार्मासीटीकल ॲण्ड रिसर्च, सहजानंद नगर, शिंगणापूर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ५. | अमृतवाहीनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेचे अमृतवाहीनी कॉलेज ऑफ फार्मसी, अमृतनगर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ६. | श्री.वारणा विभाग शिक्षण मंडळाचे तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी वारणा नगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ७. | द शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे एच.आर.पटेल वुमेन्स कॉलेज ऑफ फार्मसी, शिरपूर, जि.धुळे | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ८. | द शिख एज्युकेशन सोसायटीचे गुरु नानक कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी रोड, नागपूर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ९. | गोंदिया एज्युकेशन सोसायटीचे मनोहर भाई पटेल इन्स्टि. ऑफ फार्मसी, कुडवा, जि.गोंदिया | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| १०. | वैनगंगा बहुउद्देशिय विकास संस्थेचे बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी,साकोली, जि.भंडारा | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| क) | नवीन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी महाविद्यालये | | |